
मेंदी
सुबक तुझ्या मेंदीचे, रंग कसे अलवार
प्रीत रंग त्यात, असे उमटती हळुवार ॥ १ ॥
लाल गोंद उधळली, तुझ्या गोर हाती
जणू लोभस शुभ्र, शोभे तारका नभाती ॥ २ ॥
रंगुनी ती हाती, तुझे लावण्य खुलविते
काढतेस तू परी, मनी माझिया रंगते ॥ ३ ॥
गडद रंगते येता, हात हाती माझ्या
हितगुज सांगती हाती, रेषा तुझ्या माझ्या ॥ ४ ॥
© www.saarthbodh.com
सचिन पु. कुलकर्णी
FB ID - sachin.kulkarni78